**नि.फौ.प्र.क्रं. ४२९/२०२३**
**शासन–वि–सतिश व इतर**
**नि.क्रं. ४०**

सरकार पक्षातर्फे फिर्यादी साक्षीदार क्रमांक १ यांची जबानी :–
मी याव्दारे शपथेवर कथन करते की –

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | :– | प्रशांत पद्नाभन शेट्टी |
| वय | :– | ४० वर्षे, धंदा :– व्यवसाय, |
| रा. | :– | संभाजी नगर, थरमॅक्स चौक, पुणे. |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सरकारी विधीज्ञ</u>**
**<u>श्री. संजय राठोड यांचेतर्फे शपथेवर सुरु</u>**

मागील १५ वर्षापासुन मी बांधकामाला लागणरे साहित्य भाडयाने देण्याचाा व्यवसाय प्रभा एंटरप्रायेझझ नावाने शॉप २, थरमॅक्स चौक, चिंचवड येथे करित आहे. सदरचे व्यवसायामध्ये आम्ही सेंट्रीग लोखंडी प्लेट, प्रॉप्स, च्ययनल / स्पॅन भाडयाने देतो. घटना दि. ०४.०१.२०२२ रोजी आरोपी प्रफुल्ल मुळे हा माझे दुकानावर आला व त्यांनी बांधाकामाकरिता ४० सेंटरींग प्लेट व १०० प्रॉप्स भाडयाने पाहिजे असे सांगितले. त्यानंतर सदरचे साधन देण्याकरिता आमचे रुपये ६०००/– डिपॉझीट व रुपये ७०००/– प्रति महिना भाडे ठरले होते. त्याप्रमाणे आरोपी प्रफुल्ल मुळे यांनी रुपये १३,०००/– माझेकडे जमा केले व त्यानिमीत्ताने मी दि. ०४.०१.२०२२ रोजी मी डिलीव्हरी चलन दिले. सदरचे डिलीव्हरी चलनची प्रत आता मला दाखविण्यात आली. ती तीच असुन त्याला **आर्टीकल अ** देण्यात येतो. सदरचे डिलीव्हरी चलन प्रमाणे मी आरोपी प्रफुल्ल मुळे याला भाडयाने ४० सेंटरींग प्लेट व १०० प्रॉप्स दिले.

**०२.** त्यानंतर दि. १८.०१.२०२२ रोजी आरोपी प्रफुल्ल मुळे हे पुन्हा माझे दुकानावर येवुन त्यांना अजुन १०० सेंटरीग प्लेट लागत आहे असे म्हणुन माझेकडुन पुन्हा १०० प्लेट भाडयाने घेतले व त्याचे भाडे दोन दिवसांनी देतो अशी हमी दिली होती व प्लेट घेवुन गेले.

**०३.** त्यानंतर परत दि. २१.०१.२०२२ रोजी आरोपी प्रफुल्ल मुळे पुन्हा येवुन ११० सेंटरींग प्लेट भाडयाने घेवुन गेले व त्यानिमीत्ताने त्यांनी रुपये ५०००/– भाडे अॅडव्हांस दिले होते. दि. २५.०१.२०२२ रोजी आरोपी प्रफुल्ल मुळे यांनी पुन्हा १५० सेंटरीग प्लॅट व ५० प्रॉप्स माझेकडुन भाडयाने नेले व त्यानिमीत्ताने त्यांनी रक्कम रुपये १०,०००/– दिले.

**०४.** दि. १०.०१.२०२२ रोजी आरोपी रोहीदास मंजुळं हे माझेकडे आरोपी प्रफुल्ल मुळे यांचा रेंफरसं घेवुन आले व त्यांनी माझेकडुन १०० प्रॉप्स भाडयाने घेवुन गेले व त्यानिमीत्ताने त्यांनी मला रुपये ६०००/— ॲडव्हास व रुपये ६०००/— भाडे दिले. त्या निमीत्ताने मी त्यांना दि. १०.०१.२०२२ रोजीची डिलीव्हरी पावती दिली. सदरची पावतीची प्रत आता मला दाखविण्यात आली. ती तीच असुन त्याला **आर्टीकल ब** देण्यात येतो.

**०५.** त्यानंतर पुन्हा दि. १९.०१.२०२२ रोजी आरोपी रोहीदास मंजुळं पुन्हा येवुन पुन्हा १०० प्रॉप्स माझेकडुन भाडयाने नेले व त्या निमीत्ताने रुपये ६,०००/— भाडे माझकडे जमा केले. त्यानंतर पुन्हा आरोपी रोहीदास मंजुळे काही दिवसांनी पुन्हा येवुन माझेकडुन १३० प्रॉप्स भाडयाने घेवुन गेले व भाडे रुपये ६०००/— ठरले प्रमाणे मला दिले.

**०६.** दि. १९.०१.२०२२ रोजी आरोपी बाळासाहेब गावडे हे माझेकडे आले व त्यांनी आरोपी प्रफुल्ल यांचा रेफरंस देवुन माझेकडुन ३० प्रॉप्स व ३५ स्पॅन भाडयाने नेले व त्यांनी भाडे व डिपॉझीट म्हणुन रुपये १६,१५०/— माझेकडे जमा केले व त्यानिमीत्ताने मी दि. १९.०१.२०२२ रोजी सामान देवुन त्याची डिलीव्हरी पावती दिली होती. आता मला सदरचे पावतीची पत्र दाखविण्यात आली. ती तीच असुन त्याला **आर्टीकल क** देण्यात येतो. आरोपी बाळासाहेब गावडे यांनी ३ ते ४ वेळेस पुन्हा माझेकडुन येवुन एकुण ६७५ सेंटरीग प्लेट, १८५ प्रॉप्स व ३५ स्पॅन भाडयाने नेले होते व त्याप्रमाणे त्यांनी एकुण ५६,०००/— भाडे वेळोवेळी दिले होते. सदरचे भाडे दिल्याची पावती आता मला दाखविण्यात आली. ती तीच असुन त्याला **आर्टीकल ड ते ऐ** देण्यात येतो.

**०७.** दि. ०२.०३.२०२२ रोजी आरोपी सतिश मकर हा माझे दुकानावर येवुन बाळासाहेब गावडे व प्रफुल्ल मुळे यांचा रेफरंस दिला व माझेकडुन एकुण ४२० सेंटरींग प्लेट भाडयाने नेले व त्यानिमीत्ताने मला त्यांनी डिपॉझीट व भाडे मिळुन दि. ०२.०३.२०२२ ते दि. ०४.०३.२०२२ रोजी एकुण रुपये २६,८००/— भाडे दिले व साहित्य घेवुन गेले.

**०८.** दि. २३.०४.२०२२ रोजी आरोपी अभिजीत वाघ हे माझेकडे बाळासाहेब यांचा रेफरंस दिला व त्याला एकुण २८० सेंटरींग प्लेट व ८० प्रॉप्स् भाडयाने मागितले व त्यानिमीत्ताने एकुण रुपये १५,०००/— भाडे व डिपॉझीट म्हणुन दिले होते व साहित्य घेवुन गेले. सदरचे पैसे घेवुन साहित्य देतेवेळस मी दोन डिलीव्हरी चलन दिले होते. सदरचे दोन्ही डिलीव्हरी चलनची प्रत आता मला दाखविण्यात आली. ते तेच असुन त्याला आर्टीकल **ओ व औ** देण्यात येतो.

**०९.** रोहीदास मंजुळे यांनी साहित्य नेल्याचे दुस—या महिन्यापासुन भाडेदेणे बंद केले. त्यामुळे आम्ही त्यांना फोन केला असता त्यांचा फोन बंद येत होता. त्यामुळे मी रोहीदास यांचेबद्दल प्रफुल्ल यांचेकडे चौकशी केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली व सतिश मुळे यांना विचारण्यास सांगितले. त्यांनसुध्दा उडवाउडवची उत्तरे दिली. त्यानंतर मी अभिजीत वाघ यांना फोन करुन विचारपुस केली असता त्यांनी मला सांगितले की रोहीदास ने भाडयाने नेलेले साहित्य विकुन टाकले आहे. सदरचे माहिती भेटल्यांनतर रोहीदाासने दिलेल्या पत्यावर जावुन आम्ही जावुन पाहणी केली असता तो पत्ता चुकीचा होता. अभिजीत वाघ हा आमचेकडुन काही दिवसांपुर्वीच साहित्य भाडयाने नेले होते त्यामुळे अभिजीतने दिलेल्या पत्त्याची मी जावुन पाहणी केली असता तो पत्ता चुकीचे निघाला. अभिजीत वाघने ज्या टेम्पो साहित्य नेले होते. ते टेम्पो ड्रायव्हर माझे ओळखीचा असल्यामुळे मी त्याला साहित्य कुठे पोहचविले असता असे विचारले असता त्याने ते साहित्य नगर येथे पोहचविल्याची माहिती दिली. त्यांनतर मी सदरचे ड्रायव्हरला घेवुन नगर येथील पत्यावर गेलो असता तेथे श्रीराम दळवी नावाचा व्यक्ती मला मिळाला त्यांनी सांगितले की माझे साहित्य त्यांना अभिजीत वाघ याने रुपये १,५०,०००/— विकले आहे. सदरची माहिती भेटलयांनतर मला मिळाले की अभिजीत व इतर आरोपी यांनी माझी फसवणुक केली आहे. त्यामुळे मी निगडी पोलीस स्टेशनला जावुन दि. ०६.०५.२०२२ रोजी आरोपी विरोधात तक्रारी अर्ज दिला. आता मला सदरचा तक्रारी अर्ज दाखविण्यात आला. तो तोच असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. सदरचे तक्रारीला **निशाणी क्रं. ४१** देण्यात येतो. त्यानंतर दि. ०३.०७.२०२२ रोजी पोलीसांनी माझे तक्रारची दखल घेवुन गुन्हा नोंदविण्यात आला. आता मला माझी तक्रार दाखविण्यात आली. ती तीच असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे व त्यावर माझी

सही आहे. सदरचे तक्रारीला **निशाणी क्रं. ४२** देण्यात येतो. आता मला छापिल एफआयआर दाखविण्यात आली. ती तीच असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे व त्यावर माझी सही आहे. सदरचे छापिल एफआयआरला **निशाणी क्रं. ४३** देण्यात येतो. अशा प्रकारे सर्व आरोपी लोकांन मिळुन माझी एकुण रुपये २३,४०,०००/— चे साहित्य भाडयाने घेवुन विकुप टाकले व माझी रुपये २३,४०,०००/— फसवणुक करुन नुकसान केले.

**१०.** मी आरोपी लोकांना ओळखतो. त्यापैकी आज रोजी ३ आरोपी न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**साक्षीदाराचा उलटतपास आरोपीं क्रं. १ ते ३ यांचे विधीज्ञांचा अर्ज निशाणी क्रं. ४४ व ४५ नुसार पुढील तारखेपर्यत तहकुब.**

**उलटतपास तहकुब**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.क.केले —समक्ष—

AL AMOODI ABDUL KHAYYUM Digitally signed by AL AMOODI ABDUL KHAYYUM Date: 2025.11.01 16:45:24 +0530

AL AMOODI ABDUL KHAYYUM Digitally signed by AL AMOODI ABDUL KHAYYUM Date: 2025.11.01 16:45:28 +0530

**( अल अमुदी ए. के. )**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
पिंपरी, पुणे.
दि.०१.११.२०२५

**( अल अमुदी ए. के. )**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
पिंपरी, पुणे.

**– प्रमाणपत्र –**

मी, प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ.संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय/आदेशाप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : श्रीमती किर्ती उदय पवार |
| न्यायालयाचे नांव | : अल अमुदी ए . के., न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पिंपरी पुणे. |
| न्यायनिर्णयाचे /ओदशाचे दिनांक | : ०१/११/२०२५ |
| न्यायीक अधिकाऱ्यांनी सही केल्याचे दिनांक | : ०१/११/२०२५ |
| पी.डी.एफ.फाईल अपलोड केल्याचा दिनांक | : ०१/११/२०२५ |

स्वाक्षरीत/-

लघुलेखक(श्रेणी-iii)